# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१३/५७-ए/११६९
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : info@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : २१ ऑगस्ट,२०१३.

## परिपत्रक

**विषय: महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ आणि नियम २००९ ची अंमलबजावणी करणे... अग्निशामकांच्या (Fire Extinguishers) वापराबाबत.**

संदर्भ : १) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपायायोजना अधिनियम २००६ चे कलम ३, कलम १० आणि अनुसूची १.
२) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचा कार्यालयीन आदेश क्र.८७६/एमएफएस, दि.११/१०/२०१०.

उपरोल्लिखित संदर्भ १ च्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील नागरी स्थानिक संस्था आणि विशेष नागरी प्राधिकरणाच्या क्षेत्रात निर्माण केल्या जाणा-या सर्व इमारतींकरिता आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना पुरवणे अनिवार्य आहे. उपरोल्लिखित संदर्भ २ अन्वये राष्ट्रीय इमारत संहिता,२००५ च्या भाग ४ च्या तक्ता २३ मध्ये दिलेल्या कमी, मध्यम आणि उच्च धोकादायक वर्गीकरण असलेल्या **औद्योगिक** भोगवटा म्हणजेच गट ग भोगवटांकरिता आग प्रतिबंधक यंत्रणा करिता हया संचालनालयाने सुधारित आवश्यकता जारी केल्या आहेत.

०२. उपरोक्त अधिनियमाच्या भाग ३ (३) मधील तरतुदींनुसार हया संचालनालयाने किंवा स्थानिक मुख्य अग्निशमन अधिकायाने मान्यता दिलेल्या लायसन प्राप्त अभिकरणांद्वारे इमारतीमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना पुरवणे ही मालक आणि भोगवटादाराची जबाबदारी आहे. सध्या हया संचालनालयाने २७९ लायसन प्राप्त अभिकरणांना नियुक्त केले आहे आणि www.mahafireservice.gov.in हया संचालनालयाच्या संकेतस्थळावर त्यांची सूची उपलब्ध आहे.

०३. या संचालनालयाकडे अधिनियमाच्या अनुसूची १ च्या तरतुदींच्या निर्वचनाविषयी तसेच इतर काही मुद्यांवर विकासक, वास्तुशास्त्रज्ञ, सल्लागार, लायसन प्राप्त अभिकरण आणि सामान्य जनतेकडून विविध निवेदने प्राप्त होत आहेत. सदर अनुसुचीत किमान आग प्रतिबंधक उपाययोजना स्थापित करण्याकरिता शिफारशी केलेल्या आहेत. आग प्रतिबंधक अधिनियम तरतुदींमधील अग्निशामकांचा (**Fire Extinguishers**) पुरवठा व वापर या बाबी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यांत येत आहे.

**<u>अग्निशामके (Fire Extinguishers):</u>** अग्निशामके (Fire Extinguishers) ही प्रथमोपचार अग्निशमन साधने आहेत, जी आयएस २१९० व १५६८३ नुसार संभाव्य आगविषयक धोका कोठे आहे त्याप्रमाणे इमारतीतील विविध ठिकाणी स्थापित करावयाची आहेत. इमारतीत अग्निशामकांची प्रतिष्ठापना ही काही फार तांत्रिक बाब नाही आणि मालक किंवा भोगवटादार हे आयएसआय मार्क असलेले अग्निशामक खरेदी करु शकतात आणि इमारतीत बसवू शकतात. अग्निशामक बसविणे हे काम अनुज्ञप्तीधारक अभिकरणामार्फतच करणे अनिवार्य नाही आणि जर सदर इमारत ही फक्त अग्निशामकांद्वारा संरक्षित असेल तर लायसन प्राप्त अभिकरणांकडून सदर अग्निशामक हे कार्यरत स्थितीत आहेत असे प्रमाणित करणारे **फॉर्म अ** आणि **फॉर्म ब** च्या स्वरुपातील प्रमाणपत्र मिळवण्याची गरज नाही. मात्र सदर अग्निशामके (Fire Extinguishers) ही IS Standard प्रमाणे असल्याची खात्री अग्निशमन अधिका-यांनी करावी.

०४. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ ची अनुसूची-१ आणि राष्ट्रीय इमारत संहिता,२००५ च्या भाग-४ मधील तक्ता २३ नुसार आग व जीवसंरक्षक यंत्रणेबाबत तरतुदींविषयी सुस्पष्टता आणण्याच्या हेतूने सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

21/8/13

**(एम.व्ही.देशमुख)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस सादर/अग्रेषित :-</u>

१) मा.प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधरी, मुंबई ४०० ०९३.
४) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०.
५) सर्व विभागीय आयुक्त.
६) सर्व जिल्हाधिकारी.
७) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
८) मुख्याधिकारी सर्व नगर परिषदा / नगर पंचायती.
९) सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांचे मुख्य अग्निशमन अधिकारी व प्रभारी अग्निशमन अधिकारी.
१०) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.